॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

मार्च २०२३


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org


## हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा



उभारुया गुढ्या घरोघरी ॥
दुरित तिमिर लोपू दे मनामनातले आता
शिथिल शैल्य टाकुनी करा सहर्ष स्वागता
भाग्य सूर्य येत अंबरी ॥
व्यक्ती व्यक्तीच्या मनात नांदणार आर्यता
भेदभाव सोडूनी वरील विश्वबंधुता
विजय हा आम्हा खरोखरी ॥
शक्ती मानवी महा आम्हास ज्ञात जाहले
धर्म न्याय नीतीचे जगास वेद शिकविले
सांगू द्या सगर्व वैखरी ॥
शब्द यापुढे कधीच फोल ना ठरायचा
देह चंदनी झिजून गंध दरवळायचा
नांदणार धर्म भूवरी ॥
सगुण रंग भारतीय अरुण रंगी उजळू दे
मातृभूमीची सुकीर्ती सर्व दूर पसरू दे
डोलू दे ध्वजा दिगंतरी ॥

# शाखा विभाग



◆ **इतिहास-भूगोल प्रश्नमंजुषा -**
१२ फेब्रुवारी २०२३ - सर्व शाखांमध्ये इंग्रजी, गणित व विज्ञान या विषयांच्या तासिकांवर भर देतो, त्याचबरोबर वर्धकांचा भाषा विषय (मराठी, हिंदी) रोजच्या व्यवहारातून, शाखांच्या विविध उपक्रमांतून पक्का होत असतो. उरतात इतिहास आणि भूगोल. या अत्यंत महत्त्वाच्या विषयांकडे दुर्लक्ष न होता वर्धकांच्या वार्षिक परीक्षेच्या तयारीसाठी मदत व्हावी आणि इतिहास व भूगोलातही चांगले गुण मिळावेत, यासाठी इतिहास-भूगोल प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली.

◆ **स्पर्धेचे स्वरूप :** स्पर्धा गटशः एकूण ५ फेऱ्यांत घेण्यात आली. यामध्ये KBC (based on MCQ's), Brief Description, Cross Questions, Buzzer Round व नाट्य सादरीकरण अशा फेऱ्या समाविष्ट होत्या. वर्धकांची परीक्षेत येणाऱ्या प्रत्येक प्रश्नासाठी आवश्यक तयारी या फेऱ्यांमधून करून घेण्यात आली. सहभागी संख्या = १९०.







# युवा विभाग



◆ **हरिश्चंद्र गड सहल** - दि. २६, २७ व २८ फेब्रुवारी २०२३

अतिशय उत्साही वातावरणात कार्यकर्त्यांनी गड सर केला. गडावर रम्य पहाटेच्या वातावरणात उपासना झाली आणि आकाश देशमुख यांनी प्रबोधनसत्र घेतले. दंडगोल, रस्सीखेच, ध्वजयुद्ध अशा चुरशीच्या मैदानी खेळांनी वातावरण भारून गेले. ध्वजयुध्द खेळातील सर्वोत्तम खेळाडू 'गणेश शिंदे' याला मानाचा शेला देऊन कौतुक करण्यात आले. यानंतर सहल प्रमुख प्रणव पोळ याने शिवरायांच्या जीवनातील काही प्रसंग सांगत हीच प्रेरणा घेऊन आपण शाखेत काम कसे करायला हवे याविषयी संवाद साधला. दुपारच्या वेळेत गडावर गणेश गुहेत चालू घडामोडी विषयावर अनिकेत कावणकर यांनी चर्चासत्र घेतले.

कोकणकड्यावर पोचलेल्या वर्धिनीच्या मावळ्यांसमोर अभय पोते याने 'शिवरायांचे साहस' या विषयावर कथाकथन सादर करून वातावरण शिवमय केले. दुसऱ्या दिवशी उपासना आणि सतिश बिराजदार दादाच्या प्रबोधनाने दिवसाची सुरुवात उत्साहाने झाली. त्यानंतर मंदिर व गड परिसरातील साफसफाई करुन किल्ला उतरायला सुरुवात केली. हरिश्चंद्र गडाच्या या सहलीतून शिवरायांची प्रेरणा घेऊन नव्या दमाने काम करण्यास वर्धिनीचे युवा कार्यकर्ते भरपूर ऊर्जा घेऊन परत आले.



# 'स्वरूप'मित्र समुपदेशन विभाग



सोमवार दि. ६/२/२३ रोजी आगरकर मुलींचे माध्यमिक विद्यालय येथे सौ. मेघा नगरे यांनी इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची पूर्व तयारी हे सत्र घेतले.

दि. २३/२/२३ रोजी श्री. अरविंद केळकर सरांनी वर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी 'टीम बिल्डिंग' या विषयावरती सत्र घेतले.



# उत्थान विभाग





छत्रपती शिवाजी महाराज जयंती विभागातील सर्व अभ्यासिकेत मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. शिवरायांच्या जीवनावर आधारित प्रसंग वक्तृत्व, नाट्य, कला अशा अनेक माध्यमातून विद्यार्थ्यांनी उपस्थितांसमोर मांडले. शिवरायांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

'स्व'-रूपवर्धिनी आणि लोक बिरादरी मित्रमंडळ ट्रस्ट पुणे यांच्या अंतर्गत 'मी भारतीय' या विषयावरील एकांकिका दि. २५ फेब्रुवारीला सर्व अभ्यासिकेतील ६ वी ते १० वीच्या गटातील मुलांसाठी आयोजित केली होती. मुलांच्या मनात देशप्रेम वाढावे व आपल्या बुद्धीचा, कलागुणांचा उपयोग आपल्या देशासाठी करावा असा संदेश या एकांकिकेद्वारा देण्यात आला.

◆ **नर्सरी भेट –** दि. १७ फेब्रुवारी ला विभागातील मुलांची नर्सरी भेट आयोजित करण्यात आली. तेथील अपूर्वा ताईंनी मुलांना



प्रत्येक झाडांची नावे, त्यांची वैशिष्ट्ये, गुणधर्म, फायदे, त्यांची रुजण्याची ठिकाणे यांची माहिती सांगितली. तुळस, गुलाब, ओडोमोस, मनीप्लांट या वनस्पतींचे विविध प्रकार प्रत्यक्ष पाहिल्याने मुले खुश झाली. निसर्गाशी जवळीक साधून त्यातील विविधता समजून घेण्याची ही संधी या निमित्ताने मुलांना मिळाली.



# पाकोळी बालवाडी





दि. १५ फेब्रु.ला बजाज फायनान्स कंपनीच्या CSR विभागातील अधिकारी बालवाडीची कार्यपद्धती व शिक्षकांचे अनुभव ऐकण्यासाठी आले होते. या झालेल्या संवादातून त्यांनी चालू वर्षासाठी बालवाडीला आर्थिक मदत दिली आहे. तसेच दि. २२ फेब्रु.ला सेवा इंटरनॅशनल, दिल्लीचे कार्यकर्ते श्री. निलेश मंत्री व त्यांचे सहकारी यांनी बालवाडीला खेळांच्या साहित्याचे २५ कीट भेट दिले. दि. २७ फेब्रुवारी मराठी राज्यभाषा दिनानिमित्त मोठ्या गटातील वर्गात मुळाक्षरांवर पिस्त्याच्या साली लावून अक्षर ओळख तर मधल्या गटात पॅनल बोर्डवर मुळाक्षरांच्या जोड्या लावा हे पाठ झाले. दि. २८ फेब्रुवारी विज्ञान दिन तीनही गटात साजरा झाला. छोट्या गटातील मुलांनी पंचज्ञानेंद्रियांचे गाणे अभिनयातून सादर केले. मधला गटातील मुलांनी स्पर्श ओळखा-गुळगुळीत-खरखरीत आणि हत्तीचा परिचय हे प्रयोग सादर केले. मोठ्या गटातील मुलांनी



जलचक्र, विरघळणारे-न विरघळणारे, तरंगणारे-बुडणारे पदार्थ ओळखा, मूळ रंग ओळखा इत्यादी प्रयोग सादर केले.

श्री. विश्वास कुलकर्णी, श्री. शिरीष पटवर्धन, श्रीमती पुष्पाताई नडे हे या सादरीकरणात सहभागी झाले. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मुलांनी आत्मविश्वासाने उत्तरे दिली.

समुपदेशन विभागाने पहिलीत जाणाऱ्या मोठ्या गटातील मुलांची चित्र पुस्तिकेच्या सहाय्याने बुद्धिमापन चाचणी घेतली. सर्व गटांमध्ये नियोजनपूर्वक अभ्यास चालू आहे.





# विज्ञान-तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा



विभागाच्या वतीने **'संचय ऊर्जेचा, अविष्कार विज्ञानाचा'** या स्पर्धेचे आयोजन केले. दि. १५ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर २०२२ या काळात व्हॉट्सॲपद्वारे




शालेय गटावर रोज एक प्रश्न विचारण्यात आला. या ३० प्रश्नांची उत्तरे ३१ डिसेंबरपर्यंत विभागाकडे जमा केली गेली. २१३६ विद्यार्थ्यांनी छोट्या संशोधन प्रबंध स्वरूपात उत्तरे सादर केली. यापैकी २० क्रमांक निवडण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाबरोबरच ऊर्जेची आवश्यकता, गरज भागवण्यासाठी येणाऱ्या आर्थिक प्रश्नाबरोबर इतरही प्रश्न समजावेत, याबद्दलची जागरूकता वाढावी हा हेतू होता.

प्रत्येक सहभागी शाळेतील पहिल्या तीन क्रमांकांना प्रोत्साहन बक्षीस व सर्व सहभागींना प्रमाणपत्र दिले गेले. शाळेच्या पटाच्या प्रमाणात जास्त सहभागी संख्या असलेल्या - १) भैरवनाथ विद्यालय, करंजविहीरे, ता. खेड, जि. पुणे,



२) नवोन्मेष विद्यालय, चाकण, ता. खेड, जि. पुणे ३) भाऊसाहेब राऊत विद्यालय, घोटवडी, ता. खेड, जि. पुणे या शाळांना प्रथम तीन क्रमांक देण्यात आले.



◆ **बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांची नावे -**

१) कादंबरी शिवाजी जाधव - श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, ता. भोर, जि. पुणे
२) वेदिका विनायक साकुरे - रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, ता. हवेली, जि. पुणे
३) रिद्धी गजानन काकडे - श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, ता. भोर, जि. पुणे
४) साक्षी जगदाळे - श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, ता. भोर, जि. पुणे
५) प्रज्ञा वैजिनाथ सानप - महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे
६) संस्कृती शेटे - न्यू इंग्लिश स्कूल, उत्रोली, ता. भोर, जि. पुणे
७) आदिती अंकुश शेजाळ - रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, ता. हवेली, जि. पुणे
८) प्रेम अमिष टेकाळे - नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, ता. खेड, जि. पुणे
९) प्रियांका मारुती गायकवाड - ज्ञानदा प्रशाला, किरकिटवाडी, ता. हवेली, जि. पुणे
१०) सुर्वेश विठ्ठल जामदार - बालक मंदिर संस्था इंग्लिश स्कूल, कल्याण
११) तनिष्का निलेश खुस्पे - रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, ता. हवेली, जि. पुणे
१२) श्रावणी रत्नाकर झुंजारराव - कर्नल रविंद्र माधव ओक हायस्कूल, कल्याण
१३) मयुरी संतोष शिंदे - भैरवनाथ विद्यालय, दोंदे, ता. खेड, जि. पुणे
१४) प्रतीक्षा संतोष होजगे - सरस्वती विद्यालय, औंदर, ता. खेड, जि. पुणे
१५) श्रेय उमेश पाटोळे - भैरवनाथ विद्यालय, दोंदे, ता. खेड, जि. पुणे
१६) सुजाता सहादू देवकर - ज्ञानदा प्रशाला, किरकटवाडी, ता. हवेली, जि. पुणे
१७) अनुष्कार नारायण करपे - नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, ता. खेड, जि. पुणे
१८) सई सुधीर पिंगळे - श्री म्हाळसाकांत विद्यालय, आकुर्डी, पुणे
१९) राज शशिकांत तापकीर - नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, ता. खेड, जि. पुणे
२०) तेजल अशोक देशमुख - सरस्वती विद्यालय, औंदर, ता. खेड, जि. पुणे

◆ **विद्यार्थी मनोगत –**

◆ **प्रियांका मारुती गायकवाड,** ज्ञानदा प्रशाला, किरकिटवाडी, इ. नववी – 'मला विज्ञान हा विषय लहानपणापासून आवडतो' स्पर्धेचा विषय समजल्यावर मी त्यात सहभागी व्हायचे ठरवले. रोजचा एक प्रश्न विचारल्याने तीस प्रश्न कसे संपले हे लक्षात आले नाही. खूपसे प्रश्न बॅटरीवर आधारित होते. इलेक्ट्रिक वाहनामुळे प्रदूषण कसे कमी होते हे लक्षात आले.

◆ **धीरज जगत सदर,** ज्ञानदा प्रशाला, किरकिटवाडी, इ. आठवी – स्पर्धेतील प्रश्नांनी मला पुस्तकाबाहेरचे खूप शिकवले जसे की आपण आपल्या वातावरणाचे रक्षण कसे करू शकतो, इलेक्ट्रिक कार वातावरणाचे कसे रक्षण करते, ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम इ.

## श्रद्धांजली

◆ वर्धिनीचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी व कोषाध्यक्ष श्री. विलास कुलकर्णी यांच्या आई **श्रीमती सरोजिनी विनायक कुलकर्णी** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

◆ वर्धिनीच्या चऱ्होली केंद्राचे कार्यकर्ते श्री. नितीन रासकर यांच्या आई **श्रीमती सिंधुबाई रासकर** यांचे निधन झाले.



**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**



◆ ◆ ◆